# महाराष्ट्र विधानसभाच

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील पोलीस कोठडी/कारांगृहातील मुस्लीम/दलित कैद्यांच्या संशयास्पद मृत्युंच्या चौकशीबाबत

**(१) २२०४ (२२-१२-२०१४). अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस कोठड्यांत/कारागृहांत मुस्लीम/दलीत कैद्यांच्या ३३३ संशयास्पद मृत्युप्रकरणी चौकशीची मागणी लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक धार्मिक संघटनांचे पदाधिकारी जागरुक नागरिक यांनी मा.मंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह), मा.पोलीस महासंचालक (महा.राज्य) मा.पोलीस महानिरीक्षक (कारागृह) यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनातर्फे या प्रकरणी कोणती कारवाई गठीत करण्यात आली,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निष्पन्न झाले तसेच दोषींविरोधात कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई गठीत करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :**(१) राज्यातील पोलीस कोठड्यांत / कारागृहांत मुस्लीम / दलीत कैद्यांच्या ३३३ संशयास्पद मृत्युप्रकरणी चौकशीची मागणी लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक धार्मिक संघटनाचे पदाधिकारी जागरूक नागरिक यांनी मा.मंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह), मा.पोलीस महासंचालक (महाराष्ट्र राज्य) मा.पोलीस महानिरिक्षक (कारागृह) यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा सुमारा लेखी निवेदनाद्वरे केली आहे, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हातील उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२) १९००१ (११-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हातील उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बऱ्याच ठिकाणी पाण्याच्या टाक्यां बसविल्या आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टाक्यांपैकी उल्हासनगर १, गोल मैदान येथील पाण्याचा टाकीजवळ पाण्याची गळती होत असून टाकीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे ती टाकी कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, उल्हासनगर शहरासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेंतर्गत उल्हासनगर-१ मधील गोल मैदान येथे ४.०० एम.एल. क्षमतेची उंच साठवण टाकी बांधण्यात आलेली आहे. सदर टाकीची दि.२४.०२.२०१५ रोजी प्रायोगिक तत्वावर चाचणी करतांना सदर टाकी पुर्ण भरुन काही प्रमाणात ओव्हर फ्लो झाल्यामुळे टाकीखाली पाणी साचले होते. सदर गोल मैदान टाकीतून गळती होत नाही सदर टाकीचे बांधकामासाठी चचाणी केलेली सामुग्री वापरण्यात आली आहे. त्यामुळे टाकीचे बांधकाम निकृष्ट अर्जाचे झाले नसल्याबाबत अहवाल आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(३) व (४) तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी विधानसभेमध्ये उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकमार्फत राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पाची चौकशी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मार्फत करण्याबाबतच्या सूचना सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

---

**मुंबई क्राईम ब्रँच मोटार वाहनचोरी विरोधी पथकाने बनावट कागदपत्रे तयार करुन गाडया विकणाऱ्या राजेंद्र पाटील यास अटक केल्याबाबत**

**(३) २८२२१ (०५-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट कागदपत्रांच्या आधारे बँकेतून कर्ज घेवून आलिशान गाड्यांची खरेदी करुन बनावट रजिस्ट्रेशनची कागदपत्रे तयार करुन गाडया विकणाऱ्या राजेंद्र पाटील यास मुंबई क्राईम ब्रँच मोटार वाहनचोरी विरोधी पथकाने अटक केली असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजेंद्र पाटील यास यापूर्वीही सीबीआय ने अटक केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तपासात कोणती माहिती समोर आली व फसवणूक झालेल्यांना कोणती मदत करण्यात आली तसेच गुन्हेगारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१६) :**(१) होय, राजेंद्र मारुतीराव पाटील, CBI, EOW, यांचे कडील गुर क्र. RC ०१/ ई/१०, कलम १२०(ब), ४२०, ४६७, ४६८, ४७१, भादवि सह १३ (२), सह १३ (१), (ड) पी.सी.ॲक्ट सेशन केस क्रं.११३/१० मध्ये अटक असताना त्याचा या कक्षाचा गुरक्रं.७४/२०१५, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादवि सह ३७ मो. वाहन कायदा मध्ये ताबा घेवून दि.०१/०८/२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) सदर आरोपीच्या अटके दरम्यान तो वेगवेगळया नावांने स्वत:ची कागदपत्र (पॅनकार्ड, आधारकार्ड, रेशनकार्ड, चालक परवाना) बनवून ती वेगवेगळ्या बँका/फायनान्स कंपन्यामध्ये सादर करुन महागड्या गाड्यांसाठी कर्ज घेवून त्यांची आरटीओ कार्यालयात नोंद न करता शासनाचा कर बुडवून बनावट कागदपत्र बनवून त्या गाड्या वेगवेगळ्या लोकांना विकून त्यांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. त्या संदर्भात त्यांचे विरुध्द यापूर्वी रफि अहमद किडवाई मार्ग, पवई पोलीस ठाणे व सीबीआय या ठिकाणी गुन्हे दाखल आहेत, सदर आरोपी अद्याप न्यायलयीन कोठडीत आहे.
सदर आरोपीस अटक झाल्यामुळे भविष्यात होणाऱ्या बँका/फायनान्स कंपन्या व शासनाची मोठ्या प्रमाणात होणारी फसवणूकीस आळा बसला असून सदर आरोपीस अद्यापही जामीन मंजुर झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात देशी बनावटीच्या गावठी पिस्तुलांच्या पुरवठा होत असल्याबाबत**

**(४) २८५८१ (२१-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात देशी बनावटीच्या गावठी पिस्तुलांचा उमटी या गावातून पुरवठा होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१६) :**(१) होय.
(२) सदर बाबत चोपडा शहर पो.स्टे. भाग-६ गु.र.नं.-५५/१५, भाग-६ गु.र.नं. ६१/१५. चोपडा ग्रामीण पो.स्टे. भाग-६ गु.र.नं.१०/१५ आर्म ॲक्ट ३/२५ या याप्रमाणे ३ गुन्हे दाखल आहेत. या

गुन्ह्यांत ६ आरोपीतांना अटक करण्यात आली असून संबंधित आरोपीतांनकडून ३ गावठी पिस्तोल, ८ जिवंत काडतूसे, मॅगझिन व इतर मुद्ये माल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सदर गुन्ह्यांत कोर्टात दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बालगुन्हेगारांच्या वयासंदर्भात नवीन कायदा तयार करण्याबाबत**

**(५) २८६०८ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत बारा वर्षात १८ वर्षाखालील तब्बल ८९३ मुलांनी बलात्कारा सारखे गंभीर गुन्हे केले असून ११७ हत्या आणि १२८ जणांच्या खुनाचे प्रयत्न करणे तसेच चोरी, दरोडे, आणि घर फोड्यांचेही त्यांच्या नावावर सुमारे तीन हजाराच्यावर गुन्हे दाखल झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास पोलीस सूत्राच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालगुन्हेगारांच्या वयासंदर्भात नवीन कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१) Crime in Maharashtra या शासकीय अहवालावरुन राज्यात गत बारा वर्षात १८ वर्षाखालील मुलांनी बलात्कारासारखे १३७३, १४४७ हत्या १२६२ खुनाचे प्रयत्न, २१४४८ चोरी, दरोडे व घर फोडी चे गुन्हे केलेले आहेत.

(२) बाल गुन्हेगार च्या अनुषंगाने the Juvenile Justice (Care and Protection of Children Act), २०१५ या कायद्यामध्ये भारत सरकारच्या दि.१.१.२०१६ च्या राज्यपत्रानुसार बदल करण्यात आले असून, घृणास्पद गुन्ह्यामधील बालगुन्हेगाराची मर्यादा १६ वर्षे करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा कारागृह येथे कारागृहाच्या क्षमते पेक्षा अधिक बंदी असल्याबाबत.**

**(६) २९१२० (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा कारागृह येथे कारागृहाच्या क्षमते पेक्षा अधिक बंदी असल्याची बाब दिनांक ०२ आक्टोबर, रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या भेटी दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कारागृहाची इमारत जीर्ण झाल्याने धोकादायक झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०१६) :**(१) होय.
येरवडा मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदी क्षमता पुरुष २३२३ व महिला १२६ अशी एकूण बंदीक्षमता २४४९ असून सद्य:स्थितीत ३८०० पुरुष व ३०० महिला असे ४१०० बंदी बंदीस्त आहेत.
(२) हे खरे आहे.

१) येरवडा मध्यवर्ती कारागृहाची प्रशासकीय इमारत ही ऐतिहासिक असून, य इमारतीचे बांधकाम १८७१ साली झालेले आहे,

२) सदर इमारतीच्या दुरुस्तीकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेमार्फत सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट गव्हर्मेंट इंजिनियरिंग कॉलेज, पुणे येथील प्राध्यापक श्री.बिराजदार यांचेमार्फत करण्यात आलेले आहे.

३) सदर इमारतीचे दुरुस्ती काम हे सामान्य पध्दतीने न करता, विशिष्ट शास्त्रीय पध्दतीने करण्यात यावे, असे त्यांनी ऑडित अहवालामध्ये नमूद केलेले आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास शास्त्रीय पध्दतीने दुरुस्तीचे काम करण्यास विनंती केलेली आहे.

(३) (१) येरवडा मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदी क्षमता २४४९ असून सद्य:सिती सरासरी ४१०० बंदी बंदीस्त आहेत.

(२) अतिरीक्त बंद्यांना ठेवण्याकरिता नवीन आठ (८) बॅरेक बांधकामास शासनाने प्रशसकीय मान्यता दिली असून १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत १२६.३४ लक्ष इतका निधी उपलब्ध झाला आहे.

(३) सध्या ०२ बॅरेक बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर आठ (८) बॅरेकचे बांधकाम पूर्ण झालेनंतर ४०० बंद्यांना ठेवण्याची व्यवस्था होणार आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने राज्यातील सर्व कारागृहात न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांचेसमोर सी.आर.पी.सी. ४३६ (अ) नुसार कारागृहात दाखल न्यायाधीन बंद्यांचा त्रैमासिक आढावा घेऊन अशा बंद्यांना कारागृहातून मुक्ततेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येते. तसेच बंदी दाखल असलेल्या कलमामध्ये कमाल शिक्षेच्या १/४ कालावधी व्यतित केलेल्या बंद्यांची प्रकरणे सदर न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समितीसमोर सादर केली जातात.

(५) कारागृहात दाखल न्यायाधीन बंद्यांना जामीनाच्या हक्कांबाबत मार्गदर्शन करण्यात येते तसेच जामीन/जामीन रक्कम कमी करण्यासाठी जिल्हा विधी प्राधिकरण यांचेकडील पॅनलवरील वकिलाची नेमणूक करुन कायदेशीर मदत देण्यात येते.

(६) कारागृहात प्लि बार्गेनिंग शिबीर आयोजित करण्यात येतात.

(७) पोलीस पथक उपलब्धता/व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे केसची सुनावणी याकरिता संबंधित पोलीस/न्यायालय/शासन या विभागांकडे पाठपुरावा चालु आहे.

(८) नवीन कारागृह निर्मिती, अतिरिक्त जागा प्राप्त करणे तसेच नव्याने मंजुरीप्राप्त कारागृह कार्यान्वित करणेबाबत आवश्यक कार्यवाही चालू आहे.

(९) खुले कारागृह कार्यान्वित झाल्याने मध्यवर्ती कारागृहांकडील क्षमतेपेक्षा जास्त बंदीसंख्या कमी होण्यास मदत होत आहे

(१०) क्षमतेपेक्षा जास्त बंदी दाखल असलेल्या कारागृहातील न्यायाधीन बंद्यांना संबंधित न्यायालयाची परवानगी घेऊन नजीकच्या कारागृहात वर्ग करणबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(११) कारागृह सुरक्षा यंत्रणेतील सुधारणेबाबत उपाययोजना ठरविण्यासाठी श्री.प्रविण दिक्षीत, महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालात “ज्या तुरुंगामध्ये कैद्यांची संख्या जास्त आहे त्यातील कैदी इतर कारागृहात हलवून कैद्यांचे संतुलन करणे” असे सुचविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सर्व मध्यवर्ती व जिल्हा कारागृहांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(४) निरंक.

---

## मुंबईतील मालवणी येथील झोपडपट्टयातून तसेच ब्रांदा रेल्वे स्टेशनवर मादक पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(७) २९३२० (२१-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील मालवणी येथील न्यु कलेक्टर कंपाऊंडमधील झोपडपट्टयातून तसेच बांद्रा रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफार्म नं.६, ७, वर मादक पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

मालवणी येथील न्यु कलेक्टर कंपाऊंमधील झोपडपट्टयातून तसेच बांद्रा रेल्वे स्टेशन लगतच्या परिसरात छुप्या पध्दतीने मादक पदार्थांचर विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, चौकशीनंतर न्यु कलेक्टर कंपाऊंड झोपडपट्टी परिसरात ६ गुन्ह्यांमध्ये चौकशी नंतर ७ इसमांना अटक करुन त्याचे कडून एकूण २ किलो १५७ ग्रॅम वजनाचे विविध अंमली पदार्थ (बाजारमुल्य रु.५,८४,५००/-) जप्त करण्यात आले आहेत.

बांद्रा रेल्वे स्टेशन परिसरात सन २०१५ मध्ये ११ गुन्ह्यांमध्ये चौक्शी नंतर ३ किलो २०४ ग्रॅम वजनाचे विविध अंमली पदार्थ (बाजारमुल्य रु.१९,०४,०००/-) जप्त करण्यात आले आहेत.

सन २०१५ मधील ताबा गुन्ह्यामधील अटक इसमांचे विरुध्द एनडीपीएस न्यायालयात दोषारोप पत्र सादर केलेल असून गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

अंमली पदार्थ विरोधात शाळा, महाविद्यालय इत्यादी ठिकाणी तसेच सार्वजनिक उत्सवामध्ये (उदा. दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव) व अंमली पदार्थ विरोधी पंधरवड्यात सामाजिक संस्थांच्या मदतीने विविध कार्यक्रमाद्वारे जनजागृती केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य बाल गुन्हेगारी तसेच इतर गुन्हयांत आघाडीवर असल्याबाबत**

**(८) २९६८० (२१-०१-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पवयीन मुले गुन्हेगारीमध्ये सर्वाधिक आढळून आले असल्याचे तसेच खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, दरोडे, सोनसाखळी व इतर चोऱ्या अशा गुन्हयांमध्येही देशातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य आघाडीवर असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोतर्फे नुकत्याच जाहिर केलेल्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गुन्हे रोखण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०४-२०१६) :**(१) क्राईम इंन इंडिया- सन २०१४ या वार्षिक अहवालावरुन बालगुन्हेगारी, खुन, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, इतर चोऱ्या या प्रकारामध्ये महाराष्ट्र आघाडीवर नसून, अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, पाचव्या, चौथ्या व दुसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र दरोडा, सोनसाखळी/रॉबरी या प्रकारामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे.

(२) गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता कॉम्बींग ऑपरेशन झोपडपट्टी चेकींग, नाकाबंदी, दामिनी स्कॉड, निर्भया मोबाईल तसेच रेकॉर्डवरील व हद्दपार केलेले गुन्हेगारांना चेक करुन त्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईमंदिरात सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याबाबत

**(९) २९८५५ (२१-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईमंदिरात सुरक्षा व्यवस्था तपासणीसाठी नाशिकच्या दहशत विरोधी पथकाने ऐन गर्दीच्यावेळी तीन बनावट बॉम्ब थेट मंदीरात नेऊन ठेवले तरी ही सुरक्षा यंत्रणेला खबर लागली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१६) :**(१) होय, हे खर आहे.

(२) सिंहस्थ कुंभमेळा, नाशिक च्या वेळी शिर्डी येथे होणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली. प्रत्येक गेट च्या प्रवेशाच्या ठिकाणी भाविकांना प्रवेश करण्यासाठी फिक्स बॅरेगेडींग, स्कॅनर, डी.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी. व मोबाईल जॅमर बसवीणेबाबत त्रिस्तरीय समितीचे वतीने कामाचे टेंडर काढलेले असून त्यावर कार्यवाही चालू आहे. बी.डी.डी.एस. पथकाकडून मंदीर गाभारा व परिसर यांचे दिवसातून ४ वेळा स्निफर डॉग सह अद्यावत यंत्रसह चेकींग करण्यात येते.

मंदीराच्या सर्व गेटवर साई मंदीर सुरक्षा (पोलास विभाग), साईबाबा संस्थानाकडील सुरक्षा (आस्थापना) व खाजगी एजन्सीचे कर्मचारी कार्यरत आहेत.

तसेच, श्री.साईबाबा मंदीराच्या सुरक्षेकरीता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामार्फत व्यवस्था घेणेबाबत श्री.साईबाबा संस्थान, शिर्डी तयार असून असि.इन्स्पेक्टर सी आय.एस.एफ. ची सुरक्षा व्यवस्था घेणेबाबत विचार सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) शहरात हुडको भागात हरणाचे मांस जप्त केल्याबाबत

**(१०) ३०००० (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरात हुडको भागात हरणांच्या मांसविक्री प्रकरणात शहर पोलीसांनी सात किलो मांस जप्त करुन दोन आरोपींना अटक केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी होणाऱ्या हरणांच्या शिकारी रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६)** :(१) होय.

प्रकरणी ६ आरोपींविरुध्द मालेगाव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०२४/२०१५, भारतीय प्राणी संरक्षण अधिनियम सन १९७२ कलम ५१ प्रमाणे गुन्हा दाखल करुन ६ आरोपीना अटक करण्यात आली आहे.
(२) आरोपींनी वन्य प्राणी हरणाची शिकार ही शिरसगाव व पळसगाव ता.कन्नड, जि.औरंगाबाद येथे जावुन केली असुन त्यांचे मास हे मालेगाव शहरात विक्रीसाठी आणण्यात आले होते. सदर आरोपीवर कलम ५१ भारतीय वन्य प्राणी संरक्षण अधिनियम १९७२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वन्य प्राण्यांची शिकार होत असलेबाबत प्रादेशिक वन अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद वन विभाग यांना सदर आरोपीतांची माहिती देण्यात आलेली असुन त्यावर यापुढे असे प्रकार होणार नाही याबाबत योग्य त्या उपाययोजना व खबरदारी घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे व सर्व आरोपीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## चांदा (ता. नेवासा जि.अहमदनगर) येथील राजाभाऊ पुंड याच्या वस्तीवरुन एकूण ५२ हजाराचा ऐवज चोरुन नेल्याबाबत

**(११) ३००२१ (२१-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील राजाभाऊ पुंड यांच्या वस्तीवरुन चोरट्यांनी ४५ हजार रुपये किंमतीचे सोने, चांदीचे दागिने व रोख ७ हजार असा एकूण ५२ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६)** :(१) होय.

सदर प्रकरणी प्राप्त फिर्यदीवरुन सोनई पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५५/२०१५ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि.२३/८/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.
(२) दाखल गुन्ह्यात ३ आरोपींना दि. ३०/११/२०१५ रोजी अटक करुन त्यांचे कडून चोरीस गेलेल्या मालापैकी रु. २०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे पोलीस ठाण्यासाठी व पोलीसाच्या वसाहतीसाठी जागा उपलब्ध करणे बाबत**

**(१२) ३०८३० (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील ग्रामीण पोलीस ठाण्यासाठी व पोलीसाच्या वसाहतीसाठी, मराठवाडा कृषि विद्यापीठाची पाच एकर जागा दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) जागा दिली नसल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटबंधारे विभागातील कोकण विभागाचे निवृत्त मुख्य अभियंता यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१३) ३०९५२ (२२-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटबंधारे विभागातील कोकण विभागाचे निवृत्त मुख्य अभियंता बाळासाहेब बाबासाहेब पाटील यांनी १ कोटी ३५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१६) :**(१) रायगड जिल्ह्यातील बाळगंगा प्रकल्पामध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने कोपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १२३/२०१५ अन्वये एकूण ११ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री.बाळासाहेब पाटील, तत्कालीन मुख्य अभियता व इतर लोकसेवकांनी जाणीवपूर्वक केलेल्या अनियमिततेमुळे धरणाच्या मूळ अंदाजपत्रामध्ये वेळोवेळी वाढ होऊन तसेच ठेकेदाराला केलेल्या कामाचे रु. ४९५ कोटी अदा होऊनही प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नाही. या वाढीव कामामुळे शासनाचे ९२ कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले असून त्यास संबंधित सर्व आरोपी लोकसेवक जबाबदार असल्याने श्री.बाळासाहेब पाटील, तत्कालीन मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश मुंबई यांनी वैयक्तिक स्तरावर १ कोटी ३५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झाले नाही.

(२), (३) व (४) रायगड जिल्ह्यातील बाळगंगा प्रकल्पामध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने कोपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १२३/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० (ब) १०९ सह लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १३ (१)(ड) अन्वये एकूण ११ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच श्रीबाळासाहेब पाटील, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश मुंबई येथे कार्यरत असताना कोंडाणे लघुपाटबंधारे योजनेची कामे करताना अनियमितता केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्येविरुध्द जलसंपदा विभागाच्या शासन आदेश दिनांक २२.०५.२०१४ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

## करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उजळाईवाडी येथील खरेदी केलेल्या जमिन प्रकरणी लाच घेताना सहाय्यक नगररचना अधिकाऱ्यास अटक केल्याबाबत

**(१४) ३०९९८ (२१-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उजळाईवाडी येथील खरेदी केलेल्या जमिनीच्या सातबारा उत्ताऱ्यावर मालकाचे नाव लावण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच घेताना सहाय्यक नगररचना अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी रंगेहात पकडले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) श्री.समरी अरविंद जगताप, सहाय्यक नगररचनाकार, सक्षम प्राधिकारी नागरी समूह, कोल्हापूर यांनी तक्रारदार श्री.राजेंद्र देसाई यांचेकडून रुपये २,००,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरुध्द दि. ०२.०९.२०१५ रोजी शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.क्र.१०३/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियत, १९८८ च्या कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. समीर जगताप यांना दि.२२.०९.२०१५ रोजी निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपी लोकसेवकाविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजुरी देण्यासाठी प्राधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**रायगड येथील समुद्र मार्गे संशयास्पदरित्या घुसरलेल्या घुसखोरांबाबत**

**(१५) ३१०४४ (२१-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड येथील समुद्र मार्गे संशयास्पदरित्या घुसरलेल्या ९ घुसखोरांपैकी ८ जण फणसाडच्या जंगलात लपून असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

वावडुंगी, सायगांव गावचे हद्दीतील जंगल भागात ८ ते ९ अनोळखी व्यक्ती दिसून आले असून त्यांचेकडे प्रत्येकाचे पाठीवर बॅग, दोन व्यक्तीकडे बंदुकीसारखी हत्यारे असल्याबाबत माहिती मिळाल्यानुसार स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचारी व सदर भागातील माहितगार गावकऱ्यांसह तात्काळ वावडुंगी जंगलात कोंबिग ऑपरेशन करुन शोध मोहिम करण्यात आले. तसेच जंगलात येण्या जाण्याच्या मार्गावर तसेच संपूर्ण जिल्ह्यात नाकाबंदी सुरु केली.

सदर ठिकाणचा परिपूर्ण तपास केला असता कोणत्याही प्रकारचे संशयास्पद घुसखोर आढळून आलेले नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरखेड (ता. नांदगाव जि.नाशिक) येथून कांदा चोरीला गेल्याबाबत**

**(१६) ३११८० (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरखेड (ता. नांदगाव जि.नाशिक) येथून एका शेतकऱ्याच्या कांदाचाळीतून २० क्विंटल कांदा चोरुन नेल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्याच्या भावात मोठी वाढ होत असल्याने कांदा चोरीला जात असल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांद्याची होणारी चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६)** :(१) नमूद गावातील फिर्यादी यांचे शेतामधील कांद्याच्या चाळी मधुन सुमारे १८ क्विंटल कांदा चोरीबाबत नांदगाव पोलीस स्टेशन येथे दि.२४/८/२०१५ रोजी गु.र.नं.१६७/२०१५ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे,

(२) होय.

(३) नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत दररोज नाकाबंदी लावण्यात आली. कांदा वाहतुक करणारे चाहनांची अचानक तपासणी करण्यात आली. तसेच रात्रगस्तीचे वेळी गावा गावातील पोलीस पाटील, पोलीस मित्र, ग्रामरक्षक दल यांना मार्गदर्शन करुन सर्तक केले. व त्यांनाही पोलीस रात्रगस्तीचे वेळी सामावून घेतले आहे. तसेच कांदा व्यापारी यांनाही मार्गदर्शन करुन सर्तक राहणेबाबत व कांदा चाळीस सुरक्षा रक्षक नेमणेबाबत सूचना दिल्या.

कांदा चोरण्याऱ्या टोळ्यांची गुप्त बातमीदारामार्फत तसेच स्थानिक रहिवाशी यांना विश्वासात घेवून माहिती घेण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**पेण (जि. रायगड) बाळगंगा धरण प्रकल्पाच्या कामात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१७) ३४२०९ (२२-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) बाळगंगा धरण प्रकल्पाच्या कामात गैरव्यवहार प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास केलेल्या कारवाईत आरोपी अधिकाऱ्यांच्या घरांवर छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छाप्यामध्ये काय आढळून आले करण्यात आली आहे, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्हयातील बाळगंगा प्रकल्पामध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने कोपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१२३/२०१५, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, अधिनियम, १९८८ चे कलम १३(१)(ड) अन्वये एकूण ११ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपी लोकसेवकांच्या निवासस्थानाची झडती घेतली असता ६ लोकसेवकांकडे एकूण रुपये ६,७३,२९,६८७/- इतक्या रक्कमेची मालमत्ता आढळून आली आहे. त्यापैकी श्री.रामचंद्र शिंदे, अधीक्षक अभियंता यांचेविरुध्द डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे अपसंपदेबाबत गु.र.क्र.३१२९/२०१४, लाचलुचपत व प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३(१)(ई), १३(२) अन्वये गुन्हा दाखल आहे. उर्वरित ५ लोकसेवकांच्या अपसंपदेबाबत उघड चौकशी सुरु आहे.

---

**राज्यात पोलीसांच्या कोठडीत आरोपींचा मृत्यु होण्याचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(१८) ३४२४० (२१-०१-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीसांच्या कोठडीत आरोपीचा मृत्यु होण्याचे प्रमाण वाढत असून या घटना रोखण्यास अपयशी ठरलेल्या शासनावर मुंबई उच्च न्यायालयाने ताशेर ओढल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही बसवण्यासंदर्भात दिलेल्या आदेशाचे शासनाने पालन न केल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कोठडीत आरोपींचा मृत्यु रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०१६) :**(१) व (२) मा.उच्च न्यायालयाने क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ मध्ये पोलीस कोठडीतील मृत्युचे प्रमाण विविध उपाययोजनोद्वारे कमी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे ही एक आहे.

(३) राज्यातील पोलीस स्टेशन मध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणेची कार्यवाही सुरु असून पोलीस कोठडीतील मृत्यु टाळण्याकरीता करावयाच्या उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती गठीत केलेली आहे. पोलीस कोठडीतील मृत्युचा सातत्याने आढावा घेण्यात येत असून ते रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ (जि.सोलापूर) येथील आठ वर्षीय मुलीचे अपहरण करण्यात आल्याबाबत**

**(१९) ३४२८३ (२१-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) येथील अशोक श्रीराम पवार या आरोपीने गावातील कोमल या आठ वर्षीय मुलीचे आठवडे बाजारातून अपहरण केल्याची घटना नुकतीच माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मोहोळ पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६) :**(१) व (२) होय.

प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन मोहोळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २५२/२०१५ भा.दं.वि. कलम ३६३, ३६६ प्रमाणे दि. ३०/६/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात तपास करुन पोलीसांनी पीडीत मुलगी व आरोपी यांना देऊळगांवराजा, जि.बुलढाणा येथून दि.२५/८/२०१५ रोजी ताब्यात घेतले. आरोपीने पीडीत मुलीवर जबरीसंभोग केल्याबाबत तक्रारीवरुन/जबाबावरुन सदर गुन्ह्यात भा.दं.वि. कलम ३७६ (२) सह बाल लैंगीक अत्याचार अधि.२०१२ चे कलम ४, ५, ६ हे कलमवाढ करण्यात आली आहे.

(३) होय, आरोपीस २५/८/२०१५ रोजी अटक करण्यात आली असुन आरोपी सद्य:स्थितीत न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, अहमदनगर) येथील बस स्टॉपवर मुलास आठ अनोळखी व्यक्तींनी मारहाण केल्याबाबत**

**(२०) ३४४८२ (२१-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, अहमदनगर) येथील बस स्टॉपवर १५ वर्षीय मुलास दोरीने बांधून आठ अनोळखी व्यक्तींनी मारहाण केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणतेही कारण नसतांना मारहाण करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६) :**(१) प्रश्नात नमुद प्रकरणी ९ आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करणे, तसेच फिर्यादीस पळवून नेवून ठवणे व फिर्यादिची मोटार सायकल चोरून नेल्या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२३/२०१५ भादंविक १४३, १४७, १४९, ३२३, ३४२, ३९७, ३६३ प्रमाणे दि.०५/०९/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि दोरीने बांधुन मारहाण केलेली नाही.

(२) दाखल गुन्ह्यातील ७ आरोपींना मा.जिल्हा न्यायालयाने दि.०९/१२/२०१५ रोजी अटक पुर्व जामीन मंजुर केलेला आहे. सदर ७ आरोपींना नॉमीनल अटक केली आहे. तपासात २ आरोपीविरुध्द पुरावा उपलब्ध झाला नाही. त्याचे नावे गुन्ह्यातून कमी केल्याबाबत मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आलेले आहे. तसेच आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले आहे. तसेच आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**पाकिस्तानी गायक अदनान सामी याच्या पारपत्राची मुदत संपूनही ते मुंबईत रहात असल्याबाबत**

**(२१) ३४८१९ (२१-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाकिस्तानी गायक अदनान सामी याच्या पारपत्राची मुदत संपूनही ते मुंबईत रहात असल्यामुळे मुंबई पोलिसांनी माहे ऑक्टोबर, २०१३ च्या दरम्यान त्यांना नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अदनान सामी याच्या अगोदरच्या पत्नीने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत त्याने मुंबईत बेकायदेशीररीत्या मालमत्ता विकत घेतल्याचेही निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्ररकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या पाकिस्तानी कलाकारांविषयी शासानाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) दिनांक ०४.०५.२००९ रोजी श्री.अदनान सामी यांची पत्नी श्रीमती सबा अदनान सामी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन श्री.अदनान सामी व इतर विरुध्द ओशिवरा पोलीस ठाणे येथे कलम ३२३, ५०४, ५०६, ४९८(अ), ४०६, ४२०, ३८५, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.अदनान सामी यांनी मुंबईतील बेकायदेशीररित्या मालमत्ता विकत घेतल्या प्रकरणी केंद्र शासनाच्या अखत्यारितील सक्त वसुली संचालनालय, मुंबई यांचे मार्फत कार्यवाही करण्यात आली असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**देवाडा सीमा नाक्यावर (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) ट्रकचालकाकडून अवैध वसूली प्रकरणी नागपूर व वर्धा एसीबी पथकाने कारवाई केल्याबाबत**

**(२२) ३५०५५ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या देवाडा सीमा नाक्यावर (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) ट्रकचालकाकडून अवैध वसूली प्रकरणी नागपूर व वर्धा एसीबी पथकाने दि.९.९.२०१५ रोजीच्या सुमारास कारवाई केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६)** :(१) होय.

(२) व (३) उपप्रादकशिक परिवहन विभागाच्या देवाडा सीमा नाक्यावर ट्रक चालकाकडून अवैध वसुली प्रकरणी नागपूर व वर्धा, एसीबी पथकाने दि. ०९.०९.२०१५ रोजी पोलीस स्टेशन राजुरा येथे गु.र.क्र.३०४७/१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम १३ (१)(ड)(इ) सह १३(२) व भा.दं.वि. कलम १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.रुक्मीनीकांत कळमणकर, मोटार वाहन निरीक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर व राजू मारोतराव टोंगे या खाजगी इसमास अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

---

**नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालयाची जागा एका संस्थाचालकाने**
**विकासकास विकण्याचा सौदा केल्याबाबत**

**(२३) ३६८७३ (२१-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालयाची जागा एका संस्थाचालकाने चार कोटी रुपयांना एका विकासकास विकण्याचा सौंदा केल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१६)** :(१) व (२) होय. सदर प्रकरणी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन जरिपटका येथे संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील नेकनुर येथील निजामकालीन पोलीस ठाणे व तेथील**
**अधिकारी, कर्मचा-यांची निवासस्थानांची झालेली दुरावस्थाबाबत**

**(२४) ३७१२१ (२१-०१-२०१६). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील नेकनुर येथील निजामकालीन पोलीस ठाणे व तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने सुमारे दहा वर्षापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाने मुदतबाह्य झाल्याचे सांगितले असल्याचे सप्टेंबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळालेला नसल्याने पोलीसांना या धोक्याच्या इमारतीमध्ये वास्तव्य करावे लागत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीसांच्या निवासस्थानांची झालेली दुरावस्थाबाबत प्रशासनाकडून अद्याप कोणतीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जनतेचे रक्षण करणा-या पोलीसांच्या वास्तव्याचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासन काय प्रयत्न करणार वा करीत आहे,

(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) पोलीस ठाणे नेकनुर (जि.बीड) येथील प्रशासकीस इमारत बांधण्यासाठी सन २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती परंतु आता अद्ययावत दरसूचीवर आधारीत प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीस गेलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सदन (नवी दिल्ली) येथे कक्षबंध देण्यास नकार दिल्याबाबत

**(२५) ४०२४० (२४-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या सेंट्रल आर्म्डपोलीस फोर्सच्या सहायक कमांडर पदासाठी नवी दिल्ली येथे गेलेल्या ३५-४० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सदन व्यवस्थापकाने कक्षबंध देण्यास नकार दिल्याची तसेच विद्यार्थ्यांची कागदपत्रे साक्षांकित करण्यास नकार दिल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२१०६)** :(१) हे खरे नाही. मात्र अशा आशयाचे वृत्त वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झाले होते. व त्यानुषंगाने सदर वृत्त वस्तूस्थितीवर आधारीत नसल्याचा खुलासा संबंधित वर्तमानपत्राकडे करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) येथील पोलीस ठाण्याच्या जुन्या इमारतीमध्ये असलेल्या अनेक समस्यांबाबत**

**(२६) ४१३७२ (०५-०३-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) पोलीस ठाण्याच्या इमारतीचा प्रस्ताव शासनाने २००७ मध्ये मंजूर केला असून उक्त कामासाठी अद्याप निधी उपलब्ध केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस ठाणे परिसरात अपघातामध्ये मोडतोड झालेली वाहने, फुटलेली गटारे, त्यामुळे पसरलेली दुर्गंधी, आरोपींच्या कोठड्यांसह सर्वच खोल्यामधून गळणारे पाणी, परिसरातील स्वच्छतेचा अभाव यामुळे या परिसराला बकाल स्वरूप प्राप्त झाले असून पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुन्या इमारती मध्ये अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर इमारतीच्या बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६)** :(१) (२), (३) व (४) शाहूवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या प्रस्तावास सन २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही. तथापि, शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथे पोलीस ठाणेसाठी नियंत्रण कक्षासह नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी रुपये १,९२,६८,५७४/- इतक्या अंदाजित खर्चास व नकाशास दि. १६ मे, २०१६ च्या शासन निर्णान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**जालना शहरात एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याबाबत**

**(२७) ४२१३८ (०५-०३-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरात एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची तक्रार मिळाल्यानंतर आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी त्यांचे मुलीमार्फत सापळा रचला परंतू

पोलीसांच्या बेफिकिरीमुळे त्याच आरोपींनी पुन्हा त्या मुलींवर दुस-यांदा बलात्कार केल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१) होय.
(२) दि.६.७.२०१५ रोजी घडलेल्या पहिल्या प्रकरणाबाबत पिडीत मुलीच्या तक्रारीवरुन दोन अनोळखी इसमाविरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुरनं १७१/२०१५ कलम १७६ (डी), ३९२, १७०, ३२३, ५०६, भादंवि सह कलम ५(g), R/W६ बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा, २०१२, सह ६६(E) ६७(B)(e) I.T.Act, सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल काण्यात आला आहे.

तसेच दि.९.७.२०१५ रोजी घडलेल्या दुसऱ्या प्रकरणाबाबत पिडीत मुलीच्या वडिलांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन तालुका जालना येथे गुरनं. १७३/२०१५ कलम ३७६, ३६६(अ), ३९२, ३२३, ५०६ भादंवि सह कलम ३ व ४ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षकास त्या ठिकाणाहून तात्काळ बदली करण्यात आले आहे. तसेच एका सहाय्यक पोलीस निरीक्षकास तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची प्रक्रिया कार्यवाहीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भांडूपच्या सह्याद्री नगरातील सुखकर्ता सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या एसआरए प्रकल्पाबाबत

**(२८) ४२२७१ (१७-०५-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप (मुंबई) सह्याद्री नगरातील सुखकर्ता सहकारी गृहनिर्माण सोसायटीचा एसआरए प्रकल्प मागील आठ वर्षापासून रखडला असून त्यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पात एसआरए आणि विकासक कंपनी आकर निर्माण प्रॉपर्टीज यांचे संगनमत झाल्याचे दिसून येत असून सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) मौजे कांजूर, न.भू.क्र.२३७ (पै) या भूभागावर सुखकर्ता सह.गृह.संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. सदरहू योजनेस दि.१६.१.२०१४ रोजी आशयपत्र देण्यात आसले असून पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे आराखडे दि.१८.१२.२०१४ रोजी मंजूर करण्यात आले आहेत.

सदरहू योजनेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व इतर रहिवाशी यांच्या वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे दि.३०.९.२०१५ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रथम सदरहू योजनेच्या क्षेत्राचे सिमांकन व झोपडीधारकांची पात्रता निश्चित करुन नंतर योजनेस पुढील परवानग्या देण्यात येतील असे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाकडून सदरहू झोपडीपट्टी पुनर्वसन योजनेस नियमानुसार पुढील परवानग्या देण्यात येणार आहेत.

---

## पुणे येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत

**(२९) ४२३२० (१७-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील जेजुरी आणि शिरुर येथील पर्यायी जागा विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील डेक्कन येथील धर्मादाय रुग्णालयाअंतर्गत असलेल्या सहयाद्री मल्टीस्पेशलिटी रुग्णालयावर कारवाई करण्याबाबत

**(३०) ४२९५९ (२०-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील डेक्कन येथील धर्मादाय रुग्णालयाअंतर्गत असलेल्या सह्याद्री मल्टीस्पेशलिटी रुग्णालयाने डेंगीच्या रुग्णाचे उपचाराचे बील सव्वा सात लाख रुपये केल्याने रुग्णाला घर आणि दागिने गहाण ठेवावे लागल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाला हॉस्पिटलमधील केमिस्टकडून जबरदस्तीने औषधे खरेदी करावयास लावून ५१ हजाराचे इंजेक्शन ९७ हजाराला अशी ३ इंजेक्शन रुग्णाला खरेदी करायला लावली, हे खरे आहे काय,

(३) तसेच सह्याद्री मल्टिस्पेशलिटी रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालयाअंतर्गत असूनही येथे गरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी राखीव खाटा ठेवण्यात आलेल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तसेच रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांसाठी १०% राखीव खाटा ठेवण्यासंदर्भात सह्याद्री मल्टिस्पेशलिटी या धर्मादाय रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) व (२) सह्याद्री रुग्णालयात दाखल झालेलया रुग्ण ह्या निर्धन व दुर्बल घटकातील नसल्यामुळे सदर बाब धर्मादाय आयुक्तांच्या कार्यकक्षेत येत नाही.

तथापि, सदर रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णालयाने इंजेक्शन जादा किंमतीत खरेदी करण्यास लावले याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांनी रुग्णाच्या नातेवाईकांनी जर बाजारात हे इंजेक्शन कमी किंमतीला मिळते हे सिध्द केल्यास व तसा पुरावा दिल्यास रुग्णाच्या नातेवाईकांनी भरलेली जादा रक्कम रुग्णालयाने परत करावी असा निर्णय दिला.

(३) हे खरे नाही.

सह्याद्री मल्टिस्पेशलिटी रुग्णालयामध्ये निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १०% खाटा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील अभ्युदय नगरचा (काळाचौकी) पुनर्विकास करणाऱ्या स्पर्धेतील एका विकासकाच्या गुंडांनी रहिवाश्यांना केलेली मारहाण

**(३१) ४३४८३ (०५-०३-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अभ्युदय नगरचा (काळाचौकी) पुनर्विकास करणाऱ्या स्पर्धेतील एका विकासकाच्या पात्रतेविषयी शंका घेणाऱ्या काही रहिवाश्यांना विकासकाच्या गुंडांनी घरात घुसून

जबर मारहाण केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मारहाणीच्या या घटनेमुळे अभ्युदय नगरात प्रचंड दहशतीचे वातावरण पसरले असून जखमी रहिवाश्यांनी संबंधित विकासकाच्या गुंडांविरोधात पोलिसांत तक्रार केली असता गुंडांना फक्त ताकिद देऊन त्यांची सुटका करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित पोलिस, विकासक तसेच गुडांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२१०६)** :(१) सदर बाबत परिमंडळ-४ अंतर्गत काळाचौकी पोलीस ठाणेचा अभिलेख पडताळणी केला असता कोणत्याही प्रकारच्या तक्रार अगर गुन्ह्याची नोंद नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात बनावट कागदपत्रे सादर करुन फसवणूक करणा-या एजंटला अटक केल्याबाबत

**(३२) ४३५३५ (०५-०३-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात बनावट मतदान कार्ड, पॅनकार्ड, लाईटबिले सादर करुन तसेच बनावट फीटनेस सर्टिफिकेट, विमा पॉलीसीच्या पावत्या वाहन मालकांना देवून फसवणूक करणा-या एजंटला दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एजंटने हजारो बनावट कागदपत्रे तयार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) गुन्ह्याच्या तपासात आरोपीकडून ९ विमा कंपन्यांचे १९३ बनावट विमा पॉलीसी पावत्या, २११ बनावट पत्यांचे इलेक्ट्रीसिटी बिले, २८ बनावट निवडणूक कार्डाच्या प्रती, ५३ वाहनांची फिटनेस सर्टिफिकेट जप्त करण्यात आली आहेत.
सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २८३/२०१५, भा.दं.वि. कलम ४२०, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर (जि. जळगाव) येथील प्रांत अधिकारी यांचेवर गौण खनिज आणि वाळू माफियांनी केलेला हल्ला**

**(३३) ४३७१९ (०५-०३-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि. जळगाव) येथील प्रांत अधिकारी यांचेवर २० ते २५ गौण खनिज आणि वाळू माफियांनी दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी त्यांच्या निवासस्थानाजवळ प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर गौण खनिज व वाळू माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१) दि.१७.०१.२०१६ रोजी दोन मोटार सायकलस्वारांनी रस्ता दुरुस्तीचे कारणावरुन प्रांताधिकारी यांचेवर लोखंडी रॉडने हल्ला केला असून तपासात दोन्ही आरोपी हे वाळू माफिया अथवा गौण खनिज वाहतूक करणारे नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) सदर प्रकरणी अमळनेर पोलीस स्टेशन येथे भाग-५ गु.र.नं. १९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०७, ३५३, १४३, १४७, १४८ सह मुंबई पो. अधि. ३७(१) (३) चे उल्लंघन कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना दि.१८.१.२०१६ रोजी अटक करण्यात आली आहे. सध्या दोन्ही आरोपी जमिनावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक बहिष्कार प्रतिबंध कायदा करण्याबाबत**

**(३४) ४४०७६ (१६-०५-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातपंचायतींनी सामाजिक बहिष्कार टाकणेसंबंधी कायद्याच्या प्रारुपासंदर्भात राज्य शासनाने हरकती मागविल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त झालेल्या हरकतीनुसार शासनाने महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंध कायदा करण्याकरिता कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :**(१) होय, महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम, २०१५ चा मसुदा जनतेच्या सुचना व हरकतींकरीता शासनाच्या संकेतस्थळावर दि.१८.११.२०१५ रोजी पासून दोन आठवडयासाठी प्रसिध्द करण्यात आला आहे.

(२) सन २०१६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम, २०१६ हे विधेयक मंडळाने पारीत केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुंबईसाठी पाणीपुरवठा करणा-या धरणांची सुरक्षा धोक्यात असल्याबाबत**

**(३५) ४४०८५ (१६-०३-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुंबईसाठी पाणीपुरवठा करणा-या तानसा, भातसा, वैतरणा या धरणांची सुरक्षा धोक्यात असल्याचे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात असलेल्या धरण परिसरात वाढती गुन्हेगारी, वेळोवेळी होणारे मोर्चे-आंदोलने यांसह अभयारण्य परिसर, मुंबई-नाशिक महामार्ग तसेच मध्य रेल्वेची चार स्थानके असे प्रचंड विस्तारित क्षेत्र असून शहापूर पोलीस ठाण्यात अवघे ५६ कर्मचारी कार्यरत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलाव परिसराच्या सुरक्षितेसंदर्भात तसेच कर्मचा-याची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२१०६) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) दि.०१.०८.२०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नव्याने जिल्हा निर्माण करण्यात आलेली आहे. गृह विभागाच्या शासन निर्णय क्र.अपीओ-०३१४/प्र.क्र.४७/पोल-३, दि.३१.०७.२०१४ अन्वये ठाणे ग्रामीण जिल्ह्याच्या एकूण मनुष्यबळामधून ९३४ इतके मनुष्यबळ पालघर जिल्ह्यासाठी वर्ग करण्यात आले आहे. सदर मनुष्यबळ पालघर जिल्ह्याकरीता वर्ग करण्यात आल्यानंतर मनुष्यबळ विभाजन धोरणानुसार शहापूर पोलीस ठाणेसाठी सपोफौज-०५, पोहवा-२०, पोना-२०, पोशि-२५, असे एकूण ७० मनुष्यबळ मंजुर करण्यात आले आहे, पैकी सद्यस्थितीत ५६ मनुष्यबळ कार्यरत आहे.

(३) ५ पोलीस अधिकारी नियुक्तीस असून अतिरिक्त पोलीस कर्मचारी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाभरातांडा (जि.नांदेड) येथील थावरानाईक बंजारा आश्रम शाळेतील एका विद्यार्थीनीवर शिक्षकांनी बलात्कार केल्याबाबत**

**(३६) ४४४५० (१६-०३-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाभरातांडा (जि.नांदेड) येथील थावरानाईक बंजारा आश्रम शाळेतील एका विद्यार्थीनीवर एस.बी.डांगे व बी.एन.ईबितदार या दोन शिक्षकांनी बलात्कार केल्याची तक्रार मनाठा पोलीस ठाण्यात पिडित मुलींचे पालक व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०१६) :**(१) व (२) फिर्यादी मुलगी हीच पिडीत मुलगी आहे. आरापी क्र.१ ने पिडीत मुलगी हीस दि.११.१२.२०१५ रोजी झोपेतून उठवून तीचा विनयभंग केला व आरोपी क्र.२ ने दि.१७.१२.२०१५ रोजी पिडीत मुलीस झोपेतून उठवुन ऑफिसमध्ये नेऊन बलात्कार केला व अनैसर्गिक कृत्य केले. कोणास सांगितले तर पिडीत मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली अशा दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं.०१/१६ कलम ३७६(२)(f), ३७७, ३५४, ५०६, ३४ भादंवि सह कलम ३(अ), ४, ५(F) (M) व ६ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसीतील बेकायदा बांधकाम तोडण्यास गेलेल्या अभियंत्याला केलेली मारहाण**

**(३७) ४४८१२ (०५-०३-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसीतील बेकायदा बांधकाम तोडण्यास गेलेल्या एमआयडीसीच्या अभियंत्याला दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास महेश पाटील या भूमाफीयाने व त्याच्या समर्थकाने बांधकाम तोडण्यास मज्जाव करुन मारहाण केली, तसेच या प्रकरणी मध्यस्थी करणाऱ्या पोलीसांनाही मारहाण केल्याबद्दल एमआयडीसी पोलीस ठाण्यात वा मानपाडा पोलीस ठाण्यात या भूमाफिया विरोधात गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कल्याण परिमंडळचे पोलीस उपायुक्त यांनी तसेच मानपाडा पोलीस ठाण्यातील हवालदारांनी गुन्हा दाखल करुन घेण्यास टाळाटाळ करुन मारहाणीत जखमी झालेल्या एस.बी.चोरे या हवालदाराला एम्स रुगणालयात उपचाराकरीता पाठवून गुन्हा दाखल न करण्याबाबत सांगितल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्याविरोधात तसेच भूमाफिया महेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१)होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे गु.र.नं.७०४/२०१५, भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ३३३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ सह क्रिमिनल ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमुद गुन्ह्यात १६ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी सध्या जामीनावर आहेत. सदर प्रकरणी तात्काळ कारवाई करण्यात आलेली असल्याने उक्त प्रकरणी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथे समर्थ एटरप्रायजेस नावाची शाखा सुरु करुन केंद्र शासनाच्या योजनांच्या नावाखाली नागरीकांची कोट्यवधींची फसवणूक केल्याबाबत**

**(३८) ४६६६५ (०५-०३-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील गरुड क्रिडा संकुलात समर्थ एंटरप्रायजेस नावाची शाखा सुरु करुन केंद्र शासनाच्या बेटी बचाव आणि अन्य योजनांच्या जनजागृतीच्या नावाखाली नागरीकांची कोट्यवधींची फसवणूक केल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१) व (२) धुळे शहरातील समर्थ एन्टरप्रायझेय नावाच्या कंपनीने केंद्र शासनाच्या बेटी बचाओ अभियानाचे स्टिकर वाहनावर लावून जाहिरात केल्यास त्यांना दरमहा ठराविक रक्कम देण्यात येईल या प्रकारची जाहिरात करुन लोकांकडून रु.४८,०००/- चा चेक घेवून त्याची फसवणूक केल्याबाबतची संग्राम गोविंदराव पाटील यांनी तक्रार केल्याने धुळे शहर पोलीस ठाणे येथे दि.२०/१२/२०१५ रोजी क्र.२४०/२०१५ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०.३४ सह प्राईज चिट्स अँड मणी सर्क्युलेशन स्किम ॲक्ट १९७८ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आजपावेतो पोलींसांनी केलेल्या चौकशीत लोकांची फसवणूक झाली नसल्याचे निष्पन्न झाले दाखल गुन्ह्यातील आरोपींना मा.न्यायालयाने अटक पुर्व जामीन मंजुर केला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील शासनाच्या मैदानावर अतिक्रमण करणा-यांवर समाजकंटकावर एमपीडीए लावण्याबाबत

**(३९) ४७४७६ (२०-०५-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील नक्षत्र गार्डनच्या बाजूला शासनाच्या मैदानावर संजय परदेशी नावाच्या समाजकंटकाने अतिक्रमण केले असल्यामुळे त्यांच्यावर एमआरटीपी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजकंटकावर सन २०१५ मध्ये सुध्दा एम आर टी पी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच व्यक्तीवर दोनदा एम आर टी पी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आल्यानंतरही त्या व्यक्तीवर एमपीडीए लावण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर व्यक्तीवर एमपीडीए लावण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) सदर आरोपीविरुध्द एम.आर.टी.पी. ॲक्ट अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तथापि, केवळ प्रस्तुत गुन्ह्याच्या पार्श्वभुमीवर प्रसतुत प्रकरणी एमपीडीए ॲक्टनुसार कारवाई करता येत नसल्याने, सदर आरोपीविरुध्द सदरची कारवाई करण्यात आलेली नाही. परंतु सदर व्यक्तीविरुध्द फौ.दं.प्र.सं. ११० अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

## मिहानच्या मूळ प्रकल्प अहवालातील प्रस्तावामध्ये ५० टक्के कपात तसेच प्रकल्प पूर्ण करण्याची कालमर्यादा सन २०३० वरून सन २०४५ करण्यात आल्याबाबत

**(४०) ४८२०७ (२०-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिहानच्या मूळ प्रकल्प अहवालातील प्रस्तावामध्ये ५० टक्के कपात करण्यात आल्याचे तसेच मिहान प्रकल्प पूर्ण करण्याची कालमर्यादा सन २०३० वरून सन २०४५ करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या निर्णयांना मंत्री मंडळाची मान्यता घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मूळ प्रकल्प अहवालानुसार मिहान प्रकल्प साकारण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) मिहान प्रकल्पाच्या मुळ आराखड्यात / अहवालात बदल करण्यात आलेला नाही. तथापि, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सुधारीत प्रवासी प्रक्षेपणावर आधारीत विमानतळावरुन हाताळण्यात येणाऱ्या प्रवासी संख्येचे प्रमाण अंदाजे ५० टक्के कमी करुन आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पूर्वी निश्चित केलेला कालावधी २०३० वरुन २०४६-४७ असा करण्यात आला आहे.
(२) मूळ प्रकल्प अहवालात बदल नसल्याने मंत्रिमंडळ मान्यतेची आवश्यकता नाही.
(३) व (४) मूळ प्रकल्प अहवालानुसार मिहान प्रकल्पाच्या अंमलबजावणीस शासन सतत प्रयत्नशील आहे.

---

**पुणे शहरातील कौटुंबिक न्यायालयात अपुऱ्या सोयी-सुविधांबाबत**

**(४१) ४८२३९ (२०-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील कौटुंबिक न्यायालयात अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे न्यायाधीशांसह समुपदेशक, वकील आणि पक्षकारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कौटुंबिक न्यायालयासाठी अपुरी जागा, वकिलांना, पक्षकारांना बसण्याची सुविधा नसणे, स्वच्छतागृहांची अपुरी सोय, कौटुंबिक न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे सुविधांवर ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा रु.१६.६८ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या शासनास प्राप्त झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची तांत्रिक तपासणी व छाननी पुर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम त्वरेने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती आवश्यक ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
(४) शिवाजीनगर, पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामाच्या (G+3) प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून शा.नि.क्र. सीसीबी-१११५/प्र.क्र.४३/का-१३, दिनांक ०४ एप्रिल, २०१६ अन्वये रु.१६,६७,५३,०००/- इतक्या खर्चास

मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शिवाजीनगर पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीवर ४ था व ५ वा मजला बांधण्याकरिता विधी व न्याय विभाग शा.नि.क्र. सीसीबी १११३/प्र.क्र.१९७/का-१३, दिनांक २६ एप्रिल, २०१६ अन्वये रु.१६,१९,७१,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर हद्दीत महानगरपालिकेकडून अतिक्रमणविरोधी कारवाई करत असतांना अधिकाऱ्यावर हल्ला करण्यात आल्याबाबत

**(४२) ४९२०५ (२०-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर हद्दीत महानगरपालिकेकडून अतिक्रमणविरोधी कारवाई करत असतांना अधिकाऱ्यावर हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे,
(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी येरवडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०/२०१६ भा.दं.वि. कलम ३०७, ३३२, ३५३, ३३६, ३३७, ४४७, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ४२७ सह महा.सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी ७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सर्व आरोपी जामिनावर मुक्त आहेत. तसेच, महानगर पालिकेकडून अतिक्रमण विरोधी कारवाई करीता अधिकाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्ताची मागणी केलेप्रमाणे पोलीस विभागाकडून पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हा शासकीय रूग्णालयातील शवविच्छेदन विभागातून अर्भकाचा मृत्यूदेह गायब झाल्याबाबत

**(४३) ४९५११ (२१-०३-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अशोणी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील एका महिलेने अहमदनगर जिल्हा शासकीय रूग्णालयात एका बाळाला जन्म दिला असता काही वेळातच ताप आल्याने डॉक्टरांच्या

दुर्लक्षपणामूळे उपचाराअभावी दोन दिवसाच्या बाळाचा दिंनाक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी मृत्यू असून अर्भकाचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी ठेवलेला असतांना शवविच्छेदन विभागातून अचानक गायब झाल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात तक्रार देवूनही अद्यापही दखल घेतली नसल्याने शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०४-२०१६) :**(१) होय हे अंशत खरे आहे,

दि.०५/०२/२०१६ रोजी मध्यरात्री ०२.१५ वा. सौ.सरीता गणेश भांडवलकर, रा.टाकळी, ता.कर्जत जि.अहमदनगर यांनी एका मुलाला शासकिय रुग्णालयात जन्म दिला. सदर बाळाचा उपचारा दरम्यान दि.०७/०२/२०१६ सकाळी १०.०० वा. मृत्यु झाला. सदर प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथ अकस्मात मृत्यु र.नं. ००/२०१६ सीआरपीसी १७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर अर्भकाचा मृतदेह छवविच्छेदन विभागातून दि.०७/०२/२०१६ रोजी गायब झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४१/२०१६ भा.दं.वि. कलम ३७९, २९७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणी सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील बांधकाम व्यवसायिकाचा मृतदेह**
**अंबरनाथ-बदलापूर दरम्यान रेल्वे रुळात आढळल्याबाबत**

**(४४) ४९७४१ (०५-०३-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील बांधकाम व्यवसायिक अमर भाटीया यांचा मृतदेह दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास अंबरनाथ-बदलापूर दरम्यान रेल्वे रुळात आढळला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमर भाटीया यांनी एक महिना आधी ठाणे जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे आपला छळ होत असल्याचे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तपास करण्यात आला आहे काय, तपासात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१)होय.

(२) सदर प्रकरणी मयत इसमाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील कोणत्याही शाखेत त्यांना कोणत्याही प्रकारे आत्महत्येसंदर्भात पत्र व्यवहार केला नसल्याबाबत तपासादरम्यान आढळून आलेले आहे. मयतचे प्रेतावर मरणोत्तर तपासणी दि.१७.०१.२०१६ रोजी करण्यात आली होती. दरम्यान डॉक्टरांनी मयताचे कारण Shock and Hemorrhage due to decapitation of head injury to major vessel of neck spinal cord and tracker and esophagus however blood and viscera preserved for chemical analysis असे दिलेले आहे.

(३) सदर प्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे अपघाती मृत्यु रजिस्टर नं.१४/२०१६ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये नोंद करण्यात आलेली आहे. एकंदरीत प्राथमिक चौकशीअंती यातील मयत अमर भाटीया यांनी आत्महत्या केली असावी असे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**काष्टी (ता.श्रीगांदा, जि.अहमदनगर) येथील परिक्रमा इंजिनियरींग महाविद्‌यालयाच्या बसचा झालेला अपघात**

**(४५) ५०४०८ (०५-०३-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील परिक्रमा इंजिनियरींग महाविद्‌यालयाच्या विद्‌यार्थ्यांची सहल बसने गोवा येथे गेली असता परतीच्या वेळी पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास तडबीडजवळ बस आणि ट्रॅक्टरची जोरदार धडक झाल्याने झालेल्या अपघातात ३ ठार तर २२ जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर घटनेत ३ जण ठार व ६ जण जखमी झाले आहेत.

(२) सदर अपघात लक्झरी बस चालकाच्या निष्काळजीपणामुळे घडलेला असल्याचे पोलीस चौकशीत आढळून आले आहे. या प्रकरणी तळबीड पोलीस ठाणे, जिल्हा सातारा येथे गु.र.नं. १४/२०१६ भा.दं.वि.सं. कलम २७९, ३०४ (अ) ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४,१३४ (अ) (ब) अन्वये लक्झरी बस चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुख्यात चड्डी-बनियान टोळीतील लुटारुंना शोधण्याबाबत**

**(४६) ५०९७८ (०५-०३-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली येथे कुख्यात चड्डी-बनियान टोळीतील चार लुटारुंना पोलीसांनी अटक केली असून टोळीतील फरार असलेल्या आठ ते नऊ साथीदारांना शोधण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१) होय, चड्डी-बनियान टोळीतील फरार ४ आरोपींचा तपास करण्यासाठी एक स.पो.नि. दर्जाचा अधिकारी व ४ अंमलदार यांचे पथक नेमण्यात आलेले आहे.

(२) सदर प्रकरणी पाहिजे आरोपींचा त्यांच्या संभाव्य ठिकाणाची माहिती काढुन तसेच गुप्त बातमीदार यांच्या मदतीने तपास चालु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील नविन न्यायालय इमारत बांधण्याबाबत**

**(४७) ५१७६० (०५-०३-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील नविन न्यायालय इमारत बांधण्याबाबतचे निवेदन तेथील लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास संबंधित मंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर न्यायालय इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) होय.

(२) भिवंडी, जि.ठाणे येथे नवीन न्यायालय इमारतीच्या बांधकामाचा रु. ४४.५५ कोटी इतक्या अंदाजित खर्चाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करुन सार्वजनिक बांधंकाम विभागाने रु. ३८.१६ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली असून, सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे, सदर इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे,

(३) उपरोक्त बाब विभागाकडून कार्यवाही सुरु असल्याने विलंबाबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर येथे ॲग्रीगोल्ड या कंपनीने जादा व्याजाचे प्रलोभन दाखवून सुमारे १० हजार गुंतवणुकदारांना फसविल्याबाबत**

**(४८) ५२२४९ (११-०३-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे ॲग्रीगोल्ड या कंपनीने जादा व्याजाचे प्रलोभन दाखवून जवळपास १० हजार गुंतवणुकदारांचे सुमारे ५० कोटी रुपये बुडविले असून कंपनी बंद केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१) सोलापूर शहर व ग्रामीण क्षेत्रातील कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये याबाबत गुन्हा दाखल नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील दहिसर येथील आय.सी.कॉलनी भागात मोठया प्रमाणात एमडी, चरस, गांजा यासारख्या ड्रग्जची विक्री व सेवन होत असल्याबाबत.**

**(४९) ५२७१९ (२०-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर येथील आय.सी.कॉलनी भागात मोठया प्रमाणात एमडी, चरस, गांजा यारख्या ड्रग्जची विक्री व सेवन होत असून या ठिकाणी नागरिकांची रहदारी नसल्यामुळे कॉलेजमधील मुले ड्रग्जचे सेवन करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच त्या ठिकाणी असलेली पोलीस चौकी बंद करण्यात आल्यामुळे या परिसरात घरफोडी, सोनसाखळी चोरी व इतर गुन्हयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :**(१) होय.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी एमडी.गांजा यासारख्या ड्रग्जची विक्री व सेवनासंबंधि केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर परिसरात १५ इसमांवर एनडीपीएस अॅक्ट, १९८५ च्या कीलम २७, ८ (क) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यात आलेला आहे.

तसेच घरफोडी, सोनसाखळी चोरीव इतर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी फिक्स पॉईंट तसेच व्हिजीबल पोलीसींग ठेवण्यात येते, दिवसरात्र गस्त घालण्यात येते. त्यानुषंगाने मुंबई पोलीस कायदा कलम १२२ (ई) अन्वये इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि. ठाणे) येथील नारपोली पोलिस स्टेशनमधून पोलिस कोठडीतील तीन आरोपी पळून गेल्याबाबत

**(५०) ५३०६२ (१६-०३-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील नारपोली पोलिस स्टेशनमधून पोलिस कोठडीतील तीन आरोपी पळून गेल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जबाबदार असणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अशा घटना वारंवार होऊ नयेत म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :**(१) होय.

(२) भिवंडी येथील नारपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५९/२०१६ भा.द.वि.क. ३७९, ३४ या गुन्ह्यातील, शांतिनगर पो. स्टे. कार्यक्षेत्रातील सबजेल, भिवंडी येथील कोठडी क्र.३ मध्ये ठेवलेले ३ आरोपी दि.२४.०२.२०१६ रोजी पळून गेले. सदर आरोपींना पुन्हा दि.२५.०२.२०१६ व ०१.०३.२०१६ रोजी अटक करण्यात आलेली आहे व सदर आरोपींविरुध्द शांतीनगर पो.स्टे. येथे गुन्हा रजि. नं. ६४/२०१६ भा.दं.वि.क. २२४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सबजेल कर्तव्यावर असलेली पोलीस अंमलदार यांनी कर्तव्यात कसुरी केल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आल्याने त्यांची पुढील वेतनावर परिणाम होणार नाही अशा रितीने २ वर्षे वेतन वाढ रोखण्याची शिक्षा देण्यासाठी नोटिस दिलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गार्डरुमची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना गार्ड डयूटीच्या वेळेस दक्ष राहणेबाबत सूचना देण्यात आलेल्या असून गस्तीवरचे अधिकारी यांना वेळावेळी गार्डरुम तपासणे बाबत ही सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.